महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे    Rs.2/-    कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ❖ ११ मे २०२५ ❖वर्ष ६ ❖अंक ३१२ ❖ पाने - ४    ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## युद्धजन्य परिस्थितीत जिल्हा प्रशासन सज्ज

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे: सध्या देशात असलेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर जिल्हा प्रशासनाने भर दिला आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आणि नागरी संरक्षण दलाचे नियंत्रक अशोक शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या एका महत्त्वपूर्ण बैठकीत त्यांनी प्रशासनातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

या बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी श्री.शिनगारे यांनी सुरक्षित निवारागृहांची निवड करून ती सर्व सोयीसुविधांनी सज्ज ठेवण्याचे तसेच नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवण्याचे निर्देश दिले. यासोबतच सायरनची नियमित तपासणी करणे, जिल्ह्यातील संवेदनशील ठिकाणे निश्चित करून त्यांच्या सुरक्षा व्यवस्थेची तातडीने पाहणी करणे यावर त्यांनी विशेष भर दिला. आपत्ती व्यवस्थापनाच्या काळात सामाजिक संस्थांचे महत्त्वपूर्ण योगदान लक्षात घेता, त्यांच्याशी संबंधित माहिती अद्ययावत ठेवण्याचे आदेशही त्यांनी दिले. जीवनावश्यक वस्तू व साहित्याची यादी तयार करून पुरवठादारांची माहिती अद्ययावत ठेवण्यासोबतच, आपल्या विभागाशी संबंधित सर्व माहिती तातडीने अद्ययावत करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.




"आता प्रत्येकाने जबाबदारीने वागण्याची वेळ आहे. देशासाठी आणि समाजासाठी एकजुटीने काम करण्याची ही वेळ आहे. सर्वांनी आपले कर्तव्य ओळखून पूर्ण तयारी करावी. जशी वेळ येईल, तसे आपले कर्तव्य बजावण्यासाठी मागेपुढे पाहू नका," असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना केले.

त्यांनी पुढे सांगितले की, सर्वांना रजेवरून पुन्हा कर्तव्यावर रुजू होण्याचे आदेश देण्यात आले असून, आता ही आपल्या सर्वांच्या 'परीक्षेची वेळ' आहे, त्यामुळे प्रत्येकाने सर्व प्रकारे सज्ज राहावे. या महत्त्वपूर्ण बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे आणि पोलीस सह आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांनीही मार्गदर्शन केले. त्यांनी आपापल्या विभागाच्या तयारीबाबत माहिती दिली आणि जिल्हा प्रशासनाच्या प्रयत्नांना पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

या बैठकीस अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.

### सुरक्षित निवारागृहांसह सर्व यंत्रणा अद्ययावत ठेवण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

संदीप माने, महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, सुनील पवार, अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड, सर्व प्रांताधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, नागरी संरक्षण दलाचे उपनियंत्रक विजय जाधव, महानगरपालिकांचे उपायुक्त, कार्यकारी अभियंता सुनील पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ.अनिता जवंजाळ, भारतीय भू-सेना व वायुसेनेचे प्रतिनिधी अधिकारी यांच्यासह विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.एकंदरीत, सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने घेतलेली ही तातडीची बैठक आणि जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेले निर्देश, जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे.

## पाकिस्तानी आर्मीचे सरकारविरोधात बंड ?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


भारत आणि पाकिस्तान यांच्यात शस्त्रसंधी झाली आहे. दोन्ही देशांनी अधिकृतपणे तसे सांगितले आहे. दरम्यान, दोन्ही देशांतील युद्धजन्य परिस्थिती निवळत आहे, असे सांगितले जात असतानाच भारत-पाकिस्तानने सीमेवर पुन्हा एकदा शस्त्रसंधीचे उल्लंघन केले आहे.

याच कारणामुळे सध्या सीमाभागात तणाव निर्माण झाला आहे. नेमकं काय घडलं? मिळालेल्या माहितीनुसार भारत आणि पाकिस्तान सीमाभागात पाकिस्तानने शस्त्रसंधीचे उल्लंघन केले. पाकिस्तानने काश्मीरमध्ये ड्रोन हल्ले केले आहेत. श्रीनगरमध्ये 50 हून अधिक स्फोटांचे आवाज ऐकू आले आहेत. पंजाब, राजस्थान राज्यातील सीमाभागातही ड्रोन दिसल्याचे वृत्त आहे. याच कारणामुळे पंजाब, राजस्थान, जम्मूत ब्लॅकआऊट करण्यात आले आहे. पंजाबच्या एकूण 9 शहरांत संपूर्णपणे ब्लॅकआऊट करण्यात निर्णय घेण्यात आला आहे. पंजाबच्याही भोगा परिसरात ब्लॅकआऊट करण्यात आले आहे. पाकिस्तानी लष्करांचे बंड? तसं पाहायचं झालं तर पाकिस्तान सरकारनेच भारताला कॉल करून शस्त्रसंधीच्या चर्चेला सुरुवात केली होती. त्यानंतर मात्र अवघ्या काही तासांत पाकिस्तानच्या लष्कराने भारतावर हल्ले केले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार पाकिस्तानी

लष्कर आता पाकिस्तानी सरकारच्या विरोधात गेले आहे. त्यामुळेच आता पाकिस्तानी आर्मीने पाकिस्तानी सरकारविरोधात बंड तर केले नाही ना? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दरम्यान, आता पाकिस्तानने शस्त्रसंधीचे उल्लंघन केल्यावर भारत सरकार आणि लष्कर नेमकी काय भूमिका घेणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

### लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत

## भाजप-शिवसेनेचा हितेंद्र ठाकूर यांना जोरदार धक्का




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत बहुजन विकास आघाडीच्या तिन्ही आमदारांचा पराभव करत भाजप-शिवसेनेने हितेंद्र ठाकूर यांना जोरदार धक्का दिला. आता बहुजन विकास आघाडीची महापालिकेतील अनेक वर्षांची सत्ता उलथवून टाकण्यासाठी भाजपने डावपेच आखले आहेत. त्यामुळे हितेंद्र ठाकूर आणि त्यांच्या चिरंजीवापुढे अस्तित्व राखण्याचेच आव्हान उभे राहिले आहे.

गतवर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत पालघर मतदारसंघातून भाजपचे हेमंत सावरा विजयी झाले. केवळ विजयीच झाले नाहीत, तर बहुजन विकास आघाडीला भाजप-शिवसेना युतीने पाणी पाजले. बविआ तिसऱ्या नंबरवर फेकला गेला. शिवाय बविआचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या वसईतून जवळपास 10 हजार, नालासोपाऱ्यातून 57 हजार आणि बोईसर मधून 39 हजार मतांची आघाडी घेतली. त्यापाठोपाठ झालेल्या विधानसभा निवडणुकीत तर बहुजन विकास आघाडीचा सर्वात दारूण पराभव झाला. पक्षाचे प्रमुख हितेंद्र ठाकूर यांचा वसईतून भाजपच्या स्नेहा पंडित यांनी पराभव केला. तर पुत्र क्षितिज ठाकूर यांना नालासोपाऱ्यातून राजन नाईक यांनी धूळ चारली. बोईसरमध्ये गतवेळी संतोष जनाठे यांच्या बंडखोरीमुळे थोडक्यात वाचलेल्या बविआच्या राजेश पाटील यांना यंदा शिवसेनेच्या विलास तरे यांनी घरी बसवले. या तिन्ही जागा हातून गेल्याने बविआला मोठा झटका बसला आहे.

त्याचवेळी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील

**बहुजन विकास आघाडीची महापालिकेतील अनेक वर्षांची सत्ता उलथवून टाकण्यासाठी भाजपने डावपेच आखले आहेत. त्यामुळे हितेंद्र ठाकूर आणि त्यांच्या चिरंजीवापुढे अस्तित्व राखण्याचेच आव्हान उभे राहिले आहे.**

विजयामुळे भाजप आणि शिवसेनेचा आत्मविश्वास कमालीचा वाढला आहे. आता हे दोन्ही पक्ष हितेंद्र ठाकूर यांची महापालिकेतील जवळपास 35 वर्षांची सत्ता उलथवून टाकण्यासाठी सज्ज झाले आहेत. याच रणनीतीचा भाग म्हणून माजी आमदार विवेक पंडित सक्रिय झाले आहेत. त्यांच्या श्रमजीवी संघटनेने महापालिकेत शिरकाव केला आहे. आमदार राजन नाईक आणि आमदार स्नेहा पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून इथे फिल्डिंग लावली आहे. निधीसाठी त्यांनी हिवाळी आणि अर्थसंकल्पीय अधिवेशनात इथले प्रश्न लावून धरले होते. आढावा बैठक घेऊन पालिकेतील प्रशासनावर आपली पकड निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामुळे बविआ बॅकफूटवर गेलेला पहायला मिळत आहे.

वसई-विरार महापालिकेची शेवटची निवडणूक 2015 मध्ये झाली होती. यात 115 पैकी तब्बल 105 जागा जिंकत ठाकूर यांनी आपले वर्चस्व सिद्ध केले होते. पण आता ठाकूर यांच्या पक्षातून तिन्ही आमदा वजा झाले आहेत. शिवाय भाजप आणि शिवसेनेची पकड दिवसेंदिवस घट्ट होत आहे. अशात महापालिकाही हातून गेली तर पक्षाचे अस्तित्वच संपुष्टात येईल. आता बविआने आपल्या दिग्गज आणि वरिष्ठ नेत्यांना महापालिकेत उतरविण्याची तयारी केली आहे. कार्यकर्त्यांनाही लोकांशी तुटलेली नाळ पुन्हा जोडून लोकांमध्ये जाण्यासाठी कार्यक्रम आखण्याचे आदेश ठाकूर यांनी दिले आहेत. मतदारांनी राष्ट्रीय पक्ष बघून लोकसभा आणि विधानसभेला मतदान केले होते. पण महापालिकेला व्यक्ती पाहून मतदान केले जाईल असा पक्षाला विश्वास आहे.

## पनवेलमध्ये तांदळाची तस्करी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पनवेल : मुंबई गोवा महामार्गावरील पळस्पे फाटाजवळील ओशियन गेट पार्किंग कंपाऊंडजवळ बुधवारी (७ मे) सायंकाळी साडेचार वाजता सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील १२७९ गोणी तांदळाने भरलेला ट्रक पनवेलच्या पुरवठा अधिकाऱ्यांनी पनवेल शहर पोलिसांच्या मदतीने पकडला. हा तांदळाचा साठा खालापूर येथील जय आनंद फुड इंडस्ट्रीज कंपनीचा असल्याचे पोलिसांच्या आतापर्यंतच्या तपासात उघड झाले आहे. गरीब नागरिकांच्या हक्काचा तांदूळ परदेशात पाठविण्यासाठी पनवेल येथे आणणार असल्याची माहिती पुरवठा अधिकारी अश्विनी धनवे यांना मिळाली होती. पुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांसह धनवे यांनी सापळा रचला. पळस्पे येथील ओशियन गेट पार्किंग कंपाऊंड येथे एक ट्रक पोलीस पथकाला सापडला. मात्र तांदळाने भरलेला दुसरा ट्रक तेथून चालकाने पळवला. ट्रकचालक शिवप्रसाद



सरोज याच्याकडे पोलिसांनी चौकशी केल्यावर त्याने १२७९ गोणी तांदूळ साठा खालापूर येथील आनंद फूड इंडस्ट्रीजच्या मालकाचा असल्याचे सांगितले.

तस्करीसाठी पनवेल सुरक्षित ठिकाण? जेएनपीटी बंदरमार्गे जल वाहतुकीने देशातील रेशनिंगचा तांदूळ परदेशात पाठविणारी टोळी सक्रिय आहे. पाच वर्षांपूर्वी देखील पनवेल येथील टेक केअर या कंटेनर गोदामात तांदळाचा २२२० गोणी साठा तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली जप्त केला होता. परदेशात तांदळाची तस्करी करून विक्रीसाठी पनवेल हे सुरक्षित ठिकाण मानले जाते.

### भिवंडी परिसरातील डोंगराळ भागातील

## गौण खनिजाचे व मातीचे बेकायदेशीरपणे उत्खनन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी तालुक्यातील पडघा वनपरिक्षेत्र व भिवंडी वनपरिक्षेत्र परिसरातील वन खात्याच्या डोंगरावरील गौण खनिजाचे व मातीचे उत्खनन व झाडांची मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीरपणे कत्तल सुरू असून भूमाफिया,बिल्डर लॉबी व राजकीय हितसंबंधित यांना कोकण विभागीय वन संरक्षक व संबंधित वनपरिक्षेत्र यांचे आशीर्वाद असल्याचा संशय नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. भिवंडी तालुक्यातील वन खात्याच्या डोंगरावर मागील अनेक महिन्यांपासून मातीचे, गौण खनिजाचे भूमाफियांकडून व बिल्डरांकडून मोठ्या प्रमाणावर उत्खनन सुरू आहे. त्यामुळे वनखात्याचे दररोज करोडो रुपयांचे आर्थिक नुकसान होत आहे. या उत्खननाने या परिसरातील डोंगर



### वनविभागाचे करोडो रुपयांचे नुकसान

भाग नष्ट होत चालला असून,त्यामुळे आजूबाजूच्या पर्यावरणास व वन्य प्राण्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे पडघा वनपरिक्षेत्रपाल व भिवंडी वनपरिक्षेत्र पाल यांच्या डोळया देखत हे गौण खनिज उत्खननाचे काम चालू असताना सुद्धा सदर अधिकारी संबंधित भूमाफिया विरुद्ध कोणतीही कारवाई करीत नाही. सदर वन अधिकाऱ्यांना या भूमाफिया कडून मोठ्या प्रमाणावर हप्ता दिला जात असल्याचे तक्रारी व भूमापियानविरुद्ध कोणतीही कारवाई न करण्याच्या वन अधिकाऱ्यांच्या बोटचेपे धोरणामुळे या परिसरातील नागरिक संताप व नाराजी व्यक्त करताना दिसतात.




## एसटीच्या ताफ्यात नव्या बसेस दाखल होणार

### महामंडळाच्या बैठकीत निर्णय

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात लवकरच ३ हजार नव्या बसेस दाखल होणार आहेत. यामध्ये १०० मिडी बसचा देखील समावेश आहे. सद्यःस्थितीत महामंडळाकडे सुमारे १५ हजार बसेस आहेत. आता नव्या बसेसच्या खरेदीमुळे प्रवाशांसाठी अधिक सोयीसुविधा आणि बससेवा उपलब्ध होणार आहे. या निर्णयाला एसटी महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, कामगार आयुक्त ह. पि. तुम्मोड यांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या ज्या भागात लालपरी पोहोचू शकत नाही, अशा भागांमध्ये या मिडी बसेसची सेवा पुरवण्यात येणार आहे. १०० मिडी बसेस मुख्यतः डोंगराळ आणि अतिदुर्गम भागांमध्ये चालवण्यात येणार आहेत. त्यामुळे आदिवासी पाडे, दुर्गम गावे आणि डोंगराळ क्षेत्रांमध्ये राहणाऱ्या नागरिकांनाही एसटीची सेवा पोहोचणार आहे. या नव्या बसेसच्या खरेदीमुळे



एसटीच्या ताफ्याला नवसंजीवनी मिळणार आहे. तर प्रवाशांना अधिक सक्षम, सोयीस्कर आणि विश्वासार्ह सेवा मिळणार आहे. या नवीन ३ हजार बसेसमध्ये पूर्वीप्रमाणे ३ बाय २ आसन व्यवस्था असणार आहे. त्यामुळे प्रत्येक बसमध्ये सध्याच्या तुलनेत १५ ते १७ प्रवासी अधिक बसू शकतील. त्यामुळे प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता हो व्यवस्था अधिक उपयुक्त ठरणार आहे. विना अपघात सेवा देणाऱ्या चालकांना मिळणार रोख बक्षीस वर्षातील २६० दिवस विनाअपघात सेवा बजवणाऱ्या चालकांचा रोख रक्कम देऊन १५ ऑगस्ट, २६ जानेवारी व १ मे या राष्ट्रीय सणादिवशी सत्कार करण्यात येणार आहे. याबरोबरच पाच वर्षे, दहा वर्षे, पंधरा वर्षे, वीस वर्षे विना अपघात सेवा बजावणाऱ्या चालकांचा देखील तितकीच रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात येणार आहे, असे एसटी महामंडळाकडून स्पष्ट करण्यात आले.



# गीतासार



## अध्याय १०
## विभूतियोगः

द्यूतं छलयतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् । जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि सत्त्वं सत्त्ववतामहम् ॥ १०-३६ ॥

मी छल करणाऱ्यांतील द्यूत आणि प्रभावशाली पुरुषांचा प्रभाव आहे. मी जिंकणाऱ्यांचा विजय आहे. निश्चयी लोकांचा निश्चय आणि सात्त्विक पुरुषांचा सात्त्विक भाव मी आहे. ॥ १०-३६ ॥

वृष्णीनां वासुदेवोऽस्मि पाण्डवानां धनञ्जयः । मुनीनामप्यहं व्यासः कवीनामुशना कविः ॥ १०-३७ ॥

वृष्णिवंशीयांमध्ये वासुदेव अर्थात मी स्वतः तुझा मित्र, पांडवांमध्ये धनंजय म्हणजे तू, मुनींमध्ये वेदव्यास मुनी आणि कवींमध्ये शुक्राचार्य कवीही मीच आहे. ॥ १०-३७ ॥

दण्डो दमयतामस्मि नीतिरस्मि जिगीषताम् । मौनं चैवास्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवतामहम् ॥ १०-३८ ॥

दंड करणाऱ्यांचा दंड म्हणजे दमन करण्याची शक्ती मी आहे, विजयाची इच्छा करणाऱ्यांची नीती मी आहे. गुप्त ठेवण्यासारख्या भावांचा रक्षक मौन आणि ज्ञानवानांचे तत्त्वज्ञान मीच आहे. ॥ १०-३८ ॥

यच्चापि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन । न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम् ॥ १०-३९ ॥

आणि हे अर्जुना, जे सर्व भूतांच्या उत्पत्तीचे कारण तेही मीच आहे. कारण असे चराचरातील एकही भूत नाही की, जे माझ्याशिवाय असेल. ॥ १०-३९ ॥

नान्तोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप । एष तूद्देशतः प्रोक्तो विभूतेर्विस्तरो मया ॥ १०-४० ॥

हे परंतपा (अर्थात शत्रुतापना अर्जुना), माझ्या विभूतींचा अंत नाही. हा विस्तार तर तुझ्यासाठी थोडक्यात सांगितला. ॥ १०-४० ॥

# आरोग्य
## भेंडीचे फायदे



पचायला सोपी आणि थंडावा देणारी असल्यानं, उन्हाळ्याच्या हंगामासाठीं सर्वोत्तम भाज्यांच्या यादीत भेंडीचा नंबर लागतो. भेंडीमध्ये फायबर, जीवनसत्त्व अ, क आणि पोटॅशियम आणि मॅग्नेशियमसारखी खनिजं तसंच अँटिऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात.

- भेंडी खाल्ल्यानं पचनसंस्था मजबूत होते आणि अनेक समस्या दूर होण्यासोबतच आरोग्यही चांगलं राहतं. त्यात व्हिटॅमिन सी, मॅग्नेशियम आणि इतर अनेक पोषक घटक असतात.
- सोडियम, फॉस्फरस, कॅल्शियम, लोह आणि जस्त यांसारख्या पोषक तत्वांनी समृद्ध असलेल्या भेंडीचा थंडावा वाढतो. भेंडीमध्ये प्रथिनं, जीवनसत्त्वं, मॅग्नेशियम, फायबर तसेच अँटीऑक्सिडंट्ससह इतर पोषक घटक आढळतात. भेंडीचं पाणी प्यायल्यानं पोट थंड राहतं.
- भेंडीमध्ये मुबलक प्रमाणात फायबर आहे. त्यामुळे पचनसंस्था मजबूत करण्यासोबतच पोटाशी संबंधित सर्व समस्या देखील यामुळे दूर होतात. बद्धकोष्ठता, पोट फुगणं यासारख्या समस्यांपासून यामुळे आराम मिळतो. पोटासोबतच भेंडी हृदयासाठीही फायदेशीर आहे.

भेंडीमुळे कोलेस्टेरॉलची समस्या कमी व्हायला मदत होते आणि हृदयाचं आरोग्य चांगलं राहतं. मधुमेह असेल तर भेंडी नक्की खा. त्यात ग्लायसेमिक नावाचा घटक आढळतो, ज्यामुळे मधुमेह नियंत्रित राहण्यास मदत होते. भेंडीमुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती देखील मजबूत होते.

# ‘अपोलो-१३’चे यशापयश

नासाने ११ एप्रिल १९७० रोजी अपोलो-१३ ही तिसरी मानवी चांद्रमोहीम धाडली. ही मोहीम मानवी बुद्धिमत्तेची आणि प्रचंड साहसाची प्रचीती देणारी ठरली. जेम्स लॉव्हेल, जॅक स्वीगर्ट आणि फ्रेड हाइज हे तीन अंतराळवीर या यानातून चंद्राकडे झेपावले.



सुमारे ५६ तासांच्या प्रवासानंतर यानातील ऑक्सिजनच्या टाकीत स्फोट झाला आणि तिथून सुरू झाला जगाचा श्वास रोखणारा पृथ्वीवर परतण्याचा थरारक प्रवास! त्यांचे सुखरूप परत येणे हे मानवी चातुर्य, धैर्य आणि नासाच्या अभियंत्यांच्या कौशल्य आणि दृढनिश्चयाचा पुरावा ठरले. मोहिमेची सुरुवात नीट झाली; मात्र सर्व्हिस मॉड्यूलमधील ऑक्सिजन टाकीचा स्फोट झाला. जीवन-समर्थन प्रणालींमध्ये गंभीर बिघाड होऊन ऑक्सिजनची कमतरता जाणवू लागली. त्यामुळे त्या तिन्ही अंतराळवीरांना सर्व्हिस मॉड्यूल सोडून लूनर मॉड्यूलमध्ये वास्तव्य करावे लागले. लूनर मॉड्यूलची क्षमता तीन अंतराळवीरांसाठी पुरेशी नव्हती.

कमी वीज पुरवठा, कमी होणारा ऑक्सिजन, कार्बन डायऑक्साइडची वाढती पातळी या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी नासाचे अभियंते ह्यूस्टनमध्ये अहोरात्र काम करू लागले. यानातील सामग्रींचा वापर करून, कार्बन डायऑक्साइड स्क्रबर्समध्ये बदल करण्याचा एक मार्ग शोधण्यात आला. त्यातून कार्बन डायऑक्साइडची प्राणघातक पातळी कमी करण्यास तात्पुरते यश आले. पुढची मोठी समस्या होती, ती म्हणजे चंद्राकडे यानाला पृथ्वीच्या दिशेने वळवणे. नासाच्या अभियंत्यांनी अंतराळवीरांना पृथ्वीच्या क्षितिजाचा वापर करण्यास सांगितले.

सर्व्हिस मॉड्यूलमधील मार्गदर्शक प्रणालींशिवाय, अंतराळात अर्धे यान उद्ध्वस्त झालेले असताना, त्याची दिशा बदलून अचूक गणना करून पृथ्वीच्या दिशेने वळवणे खूप कठीण असते. पण त्या अंतराळवीरांनी सर्व समस्यांवर मात करून पुनरागमन केले. १७ एप्रिल रोजी पृथ्वीच्या वातावरणात यानाने पुन्हा प्रवेश केला आणि ते प्रशांत महासागरात सुरक्षितपणे उतरले. या मोहिमेला ‘यशस्वी अपयश’ असे संबोधले गेले. अपयश : कारण मोहिमेचे मूळ ध्येय साध्य झाले नाही, परंतु अंतराळवीरांचे वाचविलेले जीव आणि शिकलेले धडे यामुळे ही मोहीम यशस्वीच ठरली!

# रामायणातील ठिकाणं
## ज्याला भेट दिल्यानंतर तुम्हाला मिळेल प्रसन्नता

रामायण ही फक्त पौराणिक कथा नसून ती एक मानवी मूल्यांची शाश्वत प्रवासगाथा आहे. आजही भारतभर अशी अनेक ठिकाणं आहेत, जिथे रामायणाचे संदर्भ जिवंत वाटतात. ही ठिकाणं केवळ श्रद्धास्थानं नाहीत, तर ती पर्यटनाच्या दृष्टीनेही अनमोल ठिकाणं आहेत. ज्यांना अध्यात्मात रस आहे, ज्यांना भारताचा सांस्कृतिक वारसा समजून घ्यायचा आहे, किंवा जे शांततेचा शोध घेत आहेत त्यांच्यासाठी ही यात्रा विशेष आहे.

1) अयोध्या : अयोध्या! प्रभू रामचं जन्मस्थान. इथे पावित्र्याचं वजन इतकं खोल आहे की, घाटांवर चालताना प्रत्येक पाऊल इतिहासाशी जडलेलं वाटतं. अयोध्येतील राम की पैड़ी, कनक भवन, आणि अलीकडेच उभारण्यात आलेला श्रीराम मंदिर ही ठिकाणं श्रद्धेचं आणि पर्यटकांचं केंद्रबिंदू ठरत आहेत. आज अयोध्या केवळ धार्मिक यात्रेपुरती मर्यादित नाही, तर हेरिटेज वॉक, संध्याकाळचे घाट शो, आणि स्थानिक संस्कृतीशी जुळलेली शाकाहारी खाद्ययात्रा पर्यटकांना नवे अनुभव देतात.




2) चित्रकूट : चित्रकूट म्हणजे निसर्गाच्या कुशीत वसलेलं एक आत्मशोधाचं स्थान. इथे राम, सीता आणि लक्ष्मण यांनी वनवासातील प्रारंभ केला. कामदगिरी पर्वत, रामघाट, भरतकूप हे ठिकाणं धार्मिक श्रद्धेसह पर्यटकांचीही पसंती आहेत.चित्रकूटमध्ये येणारा प्रवासी केवळ देवदर्शनासाठी येत नाही, तो येतो वनराईतील निवांत शांततेचा अनुभव घेण्यासाठी. स्थानिक गाईड्ससह रामायण आधारित पदयात्रा हे एक नवीन पर्यटन आकर्षण ठरत आहे.

3) पंचवटी : पंचवटी नाशिकजवळील एक महत्त्वाचं स्थान, जिथे लक्ष्मणरेषा आखली गेली आणि रावणाने सीतेचं अपहरण केलं.येथे सीतेची गुहा, काळाराम मंदिर, गोदावरी नदीच्या घाटांवरील आरती या गोष्टी पर्यटकांना मंत्रमुग्ध करतात. आज नाशिक शहर एक हेरिटेज-सिटी म्हणून विकसित होत आहे. येथे धार्मिक पर्यटनाबरोबरच वाइन टुरिझम, ट्रेकिंग आणि नदीकिनारी होणाऱ्या सायंकाळच्या आरत्या यामुळे देशविदेशातील पर्यटकांची संख्या वाढते आहे.

4) किष्किंधा : हंपी, म्हणजे किष्किंधाचं ऐतिहासिक रूप. येथेच राम आणि हनुमान यांची भेट झाली. इथे आजही हनुमानाचं जन्मस्थान मानलं जाणारं अंजनाद्री पर्वत,सुंदर ढासळलेली वास्तुशिल्पं,आणि तुंगभद्राचे तीर पर्यटकांचं लक्ष वेधतात. युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळ म्हणून मान्यता मिळालेलं हंपी हे पुरातत्व पर्यटन,ट्रेकिंग,रॉक-क्लाइंबिंग आणि सायकल टूरसाठी प्रसिद्ध होत चाललं आहे.

5) रामेश्वरम् : रामेश्वरम्, जिथे रामाने समुद्रावर पूल बांधला. इथे धनुषकोडी, रामनाथस्वामी मंदिर, आणि राम सेतु बिंदू ही प्रमुख स्थळं पर्यटकांसाठी खूप आकर्षक आहेत.आजही येथे स्पिरीच्युअल बोट राईड्स, राम सेतू दर्शन, आणि धार्मिक स्नानाच्या २२ पवित्र कुंडांची यात्रा हा एक पूर्ण अनुभव देतात. शिवाय, रामेश्वरम् ही जागा स्पिरिच्युअल वॉटर टूरिझम साठी आदर्श ठरत आहे.

# राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन



लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

आज ११ मे, आजचा दिवस आपल्या देशात राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात १९९९ सालापासून दरवर्षी तंत्रज्ञान विकास महामंडळ ( टी डी बी ) यांच्या नेतृत्वात हा दिवस साजरा केला जातो. ११ मे १९९८ रोजी भारताने एरोस्पेस अभियंता आणि डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या मार्गदर्शनाखाली राजस्थान येथील पोखरणच्या वाळवंटात शक्ती या अण्वस्त्रांच्या चाचण्या दोन टप्प्यात यशस्वी केल्या. दोन दिवसांनी म्हणजे १३ मे रोजी पुन्हा पोखरण २ ऑपरेशन शक्ती अंतर्गत आणखी दोन अण्वस्त्र चाचण्या केल्या. अण्वस्त्रांच्या या सर्व चाचण्या यशस्वी करून भारत अण्वस्त्र संपन्न राष्ट्र बनले. तेंव्हाचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी भारत अण्वस्त्र सज्ज झाल्याचे जाहीर केले आणि करोडो भारतीयांची मान अभिमानाने उंचावली. भारताने केलेली ही दुसरी अणूचाचणी होती. १९७४ साली भारताने पहिल्यांदा अणवस्त्रांची चाचणी केली त्यावेळी इंदिरा गांधी या पंतप्रधान होत्या. त्याच्या यशस्वितेचा संकेतांक ( कोडवर्ड ) होता द बुद्धा लाफड - बुद्ध हसला.... ११ मे १९९८ रोजी दुसऱ्या यशस्वी चाचणीचा संकेतांक होता, द बुद्धा लाफड आगेन - बुद्ध पुन्हा हसला... २४ वर्षांनंतर भारताने जमिनीखालुन प्रत्यक्ष अणुस्फोट घडवून आणून ते यशस्वी केले तेंव्हा जगातील साऱ्या देशाने तोंडात बोटे घातले मित्र राष्ट्राने कौतुक केले तर शत्रू राष्ट्राचा जळफळाट झाला. ही अणूचाचणी करताना भारताने कमालीची गुप्तता पाळली होती. अमेरिकेलाही या अणूचाचणीचा सुगावा लागला नव्हता. या अणू चाचण्यांमुळे भारत जगातील सहावे अण्वस्त्र सज्ज राष्ट्र बनले. याच काळात भारताने विकसित केलले स्वदेशी बनावटीचे पहिले विमान हंस - ३ ने त्याचे पहिले उड्डाण बंगळुरू येथे घेतले. हे विमान वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचेच्या ( सीएसआयआर ) विमान नॅशनल एरोस्पेस लॅबरोटरीज ( एनएएल ) ने विकसित केले होते. तसेच ११ मे १९९८ रोजीच संरक्षण संशोधन विकास संघटना (डीआरडीओ) त्रिशूल क्षेपणास्त्राची अंतिम चाचणी पूर्ण केली गेली. कमी पल्ल्याचे पण जमिनीवरून हवेत जलद मारा करणारे त्रिशूल हे भारताच्या एकात्मिक गायडेड क्षेपणास्त्र कार्यक्रमाचा एक भाग होता. ११ मे च्या अणूचाचणी नंतर भारताने तंत्रज्ञान क्षेत्रात हे प्रचंड यश मिळवले होते म्हणूनच त्यावेळचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी ११ मे हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून घोषित केला.

# ठाणे जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा सतर्क
## नागरिकांना शांतता राखण्याचे तसेच कुठल्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : भारत-पाक सीमेवर वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून ठाणे जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा सतर्क झाली आहे.

जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, मीरा भाईंदर पोलीस आयुक्त मधुकर पांडे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे आणि पोलीस अधीक्षक डॉ. डी. स्वामी, जिल्ह्यातील सर्व महापालिका आयुक्त यांनी संयुक्तपणे जिल्ह्यातील नागरिकांना शांतता आणि सलोखा राखण्याचे, नागरिकांनी कोणत्याही परिस्थितीत घाबरून जावू नये आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

ठाणे जिल्ह्यातील सतर्कतेच्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यातही सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यात आली आहे. जिल्ह्यातील संवेदनशील ठिकाणे, महत्वाच्या इमारती आणि गर्दीच्या ठिकाणी आवश्यक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. प्रशासकीय यंत्रणांनी जिल्ह्यातील विविध भागात मॉक ड्रील आयोजित करून कोणत्याही अप्रिय घटनेचा सामना करण्यासाठी तयारी ठेवली आहे. जिल्ह्यात कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास त्वरित पोलिसांना माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या अफवा आणि द्वेषपूर्ण संदेशांवर प्रशासनाकडून बारीक लक्ष ठेवले जात आहे. भारत-पाक तणावाच्या संदर्भात चुकीच्या बातम्या पसरवणाऱ्या किंवा समाजात तेढ निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

"ठाणे जिल्हा प्रशासन आपल्या सुरक्षिततेसाठी कटिबद्ध आहे," असे सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील नागरिकांना आश्वस्त केले आहे.

# हवेत चॉपर फिरवून भोप्या गुंडाची दहशत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण - कल्याण पश्चिमेतील मिलिंदनगर जयभीम कट्टा भागात सिध्देश उर्फ भोप्या गुंडाची दहशत वाढली असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. किरकोळ कारणावरून गुरुवारी भोप्या गुंडाने मिलिंदनगर भागात राहत असलेल्या एका रिक्षा चालकावर चॉपरने वार करून गंभीर जखमी केले आहे. रिक्षा चालकावर हल्ला होत असताना परिसरातील रहिवासी भोप्या गुंडाला आवरण्यासाठी आणि रिक्षा चालकाला वाचविण्यासाठी पुढे आले. त्यावेळी भोप्या गुंडाने कमरेला लावलेला चॉपर बाहेर काढला. तो हातात घेऊन हवेत फिरवत शिवीगाळ करत, आरडाओरडा करत परिसरात नाचू लागला. या वादाच्या मध्ये कोणी पडले तर एकेका नागरिकाला मारून टाकीन, अशी धमकी देत तो रस्त्यावरील नागरिकांच्या मागे धावू लागला. हा सगळा प्रकार पाहून मिलिंदनगर भागातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. भोप्याकडून आपल्यावर हल्ला केला जाईल या भीतीने नागरिक पळून जाऊन घरात जाऊन दरवाजा बंद करून बसले,

या गुन्ह्याप्रकरणी कल्याण पश्चिम मिलिंदनगर विठ्ठलमंदिराच्या भागात राहत असलेले रिक्षा चालक डेन्जिल डेनी विल्यम (२३) यांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यात गुंड सिध्देश उर्फ भोप्या विरुध्द तक्रार केली आहे. पोलिसांनी मारहाण, शिवीगाळ आणि शस्त्र प्रतिबंध कायद्याने भोप्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे. रिक्षा चालक डेन्जिल विल्यम यांनी पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, की गुरुवारी संध्याकाळी सव्वा पाच वाजत मी व माझा रिक्षा चालक मित्र नितीन पवार डिवाईन हॉटेलच्या बाजुला असलेल्या गल्लीतील रस्त्यावर रिक्षामध्ये गप्पा मारत बसलो होतो.

यावेळी तेथे मिलिंदनगर जयभीम कट्टा भागात राहत असलेला सिध्देश उर्फ भोप्या आला. त्याने आधारवाडी कारागृह येथे यापूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून रिक्षा चालक डेन्जिल विल्यम यांच्या बरोबर वाद सुरू केला. डेन्जिलने त्याला हा विषय संपला आहे सांगून शांत राहण्यास सांगितले. पण भोप्याने आक्रमक भूमिका घेत डेन्जिलला शिवीगाळ करत मारहाण सुरू केली. अचानक घडलेल्या घटनेने डेन्जिल आणि त्यांचा मित्र नितीन पवार चक्रावून गेले. पवार डेन्जिलला भोप्यापासून सुरक्षित करण्याचा प्रयत्न करू लागला. या झटापटीत भोप्याने कमरलेला लावलेला चॉपर बाहेर काढला. तो हवेत फिरवू लागला, पवार, डेन्जिलवर हल्ला होईल या विचारातून परिसरातील नागरिक दोघांच्या बचावासाठी पुढे आहे. त्यावेळी भोप्या अधिक आक्रमक झाला. त्याने आरडाओरडा करत, शिवीगाळ करत जमलेल्या लोकांच्या मागे हातात चॉपर घेऊन धावत परिसरात दहशत निर्माण केली. या वादात कोणी मध्ये पडले तर एकेकाला मारून टाकीन अशी धमकी देत दहशत निर्माण केली, भोप्या आपल्यावर हल्ला करील या भीतीने रिक्षा चालकांच्या मदतीसाठी आलेले लोक पळून गेले. यावेळी भोप्याने रिक्षा चालक डेन्जिल विल्यमच्या हाताच्या दंडावर चॉपरने वार करून त्यांना गंभीर जखमी केले.

# कल्याण रेल्वे स्थानकाच्या समस्यांबाबत शिवसेना ठाकरे गटाचा पुढाकार

### कल्याण पूर्वेतील एफओबी, बुकिंग कार्यालय लवकरात लवकर पूर्ण करा - ठाकरे गटाची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्वेत वर्षानुवर्षे रखडलेला एफओबी, बुकिंग कार्यलय, रिक्षा स्टँडचे नियोजन आदी रेल्वे परिसरातील समस्यांबाबत आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकार्यांनी कल्याण रेल्वे स्टेशन अधिकाऱ्यांची भेट घेतली. यावेळी रखडलेला एफओबी लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख धनंजय बोडारे यांनी केली. त्याच बरोबर कल्याण पूर्वेत रिक्षा स्टँडचे नियोजन करा , प्रसाधान गृह उभारण्याची मागणी देखील या बैठकीत करण्यात आली. यावेळी जिल्हाप्रमुख धनंजय बोडारे यांच्यासह शहर प्रमुख शरद पाटील, बाळा परब, विधानसभा संघटक रुपेश भोईर, जगदीश तरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.



कल्याण पूर्वेतील लोकग्राम ब्रिजचे काम कधी पुर्ण होणार, टेंडर चा कालावधी संपला असल्यास ठेकेदार याला ब्लॅकलिस्ट करून दंड वसूल करावा नागरीकांसाठी ताबडतोब पुल सुरू करण्यात यावा. कल्याण पूर्व येथे रेल्वेची मोठी जागा उपल्ब्ध असुन कल्याण डोंबिवली महानगर पालिका व रेल्वे डिपार्टमेट ने नागरीकांत साठी अदयाप रिक्षा स्टैंड, बस डेपो, टॅक्सी स्टंड, पे आणि पार्क, स्वछता गृह त्यांचे नियोजन करून नागरिकांना दिलास देणे आवश्य होतं पण अद्याप कल्याण पूर्वच्या लोकांना अशी कोणतीच सुविधा देण्यात आली नाही.

कल्याण पूर्व विभागचे ५०% सांडपाणी हे रेल्वे हद्दीतून दुर्गाडी खाडी कडे जाते पण काही ठिकाणी रेल्वे हद्दीत नाले बांधलेले नाहीत, तेसेच हे नाले पावसाळ्या पूर्वी साफ केले जात नाही. त्यामुळे कल्याण पूर्वेतील आनंदवाडी, गणेशवाडी, कोळसेवाडी, लोकग्राम, मंगल राघो नगर या परिसरात पावसाळयात त्या नाल्यांचे पाणी शिरते व त्याचा त्रास कल्याण पूर्वच्या नागरीकांना होत असतो त्यामुळे त्यांची ताबडतोब दखल घेणे आवश्यक आहे.

कल्याण रेल्वे स्टेशन रि मॉडलिंग' नावावर रेल्वे प्रशासनाकडून व ठेकेदाराकडून अनेक झाडांची कत्तल केली आहे पण नविन एक ही झाड लावले गेले नाही. हया बाबतीत ठेकेदार व संबंधीत रेल्वे अधिकारी हयांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा. कल्याण रेल्वे स्टेशन वर अनेक असुविधा आहेत पूर्ण प्लॅटफार्मवर पीण्याच्या पाण्याच्या पुरेशी सुविता नाही. काही ठिकाणी पीण्याच्या पाण्याची सुविधा आहे पण त्याच्यात घाण पाणी साठलेले आहे ते वेळेवर साफ केले जात नाही त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे.

स्कायवॉक वर फेरीवाले बस्तान मांडून बसत असल्याने चालणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. या फेरीवाल्यांवर कारवाई करावी आदींसह इतर मागण्या यावेळी शिवसेनेच्या वतीने करण्यात आल्या.

# दुकानात कोंडून अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : दुकानात कोंडून अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग केल्याचा धक्कादायक प्रकार खडकपाडा पोलीस स्टेशनचा हद्दीत घडला असून याप्रकरणी दुकानदार गणेश म्हात्रेला खडकपाडा पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असल्याची माहिती एसीपी कल्याणजी घेटे यांनी दिली.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

# आ.निरंजन डावखरे यांच्या प्रयत्नांमुळे शिक्षकांना मिळाली पदोन्नती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे: कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार ॲड. निरंजन डावखरे यांच्या पाठपुराव्यामुळे ठाणे जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या दहा वर्षांपासून रखडलेल्या पदोन्नतीच्या प्रक्रियेचा अखेर निकाल लागला आहे. आमदार डावखरे यांनी जून 2023 पासून या मुद्याचा सतत पाठपुरावा केला.आमदार डावखरे यांनी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांचेसोबत अनेक बैठका घेतल्या तसेच पदवीधर कृती समिती आणि इतर शिक्षक संघटनांशी समन्वय साधत या प्रक्रियेला गती दिली.

09 मे 2025 रोजी समुपदेशनाद्वारे या पदोन्नतीची प्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. यामुळे शिक्षकांचे मनोबल वाढले असून त्यांना किमान 10



वर्षांनंतर त्यांच्या हक्काची पदोन्नती मिळाल्यामुळे समाधान मिळाले. आमदार डावखरे यांच्या प्रयत्नांना शिक्षक, पालक आणि पदवीधर शिक्षकांकडून सकारात्मक प्रतिक्रिया मिळत आहेत. शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी, तसेच विविध समितीचे पदाधिकारी यांचे सहकार्य या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण ठरले.

या पदोन्नती प्रक्रियेत 90 विज्ञान आणि 40 भाषा शिक्षकांना पदवीधर पदावर पेसा क्षेत्रात नियुक्ती मिळाली. ही प्रक्रिया अनेक तांत्रिक अडचणींमुळे सातत्याने विलंबित झाली होती परंतु आमदार डावखरे यांच्या कटिबद्धतेमुळे ही प्रक्रिया यशस्वी झाली. शिक्षकांनी आमदारांच्या निवासस्थानी भेट घेऊन आनंद साजरा केला आणि त्यांचे आभार व्यक्त केले.

**'शिक्षकांचे हक्क मिळवून देण्यासाठी केलेले प्रयत्न यशस्वी झाले यावर मला खूप आनंद आहे. हे माझे एक कर्तव्यच होते आणि मी त्यासाठी अखेरपर्यंत लढत राहिलो. शिक्षक हे समाजातील सर्वात महत्त्वाचे घटक आहेत आणि त्यांच्या विकासासाठी मी सदैव तत्पर असेल. या प्रक्रियेसाठी विविध शिक्षक संघटनांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो. हे यश शिक्षकांमुळे आणि त्यांच्या संघर्षामुळे शक्य झाले आहे. यापुढेही मी शिक्षण क्षेत्राच्या भल्यासाठी कार्य करत राहीन.**
**- आ.ॲड.निरंजन डावखरे**

# उल्हासनगरात धावणार शिवसेनेची तिरंगा रॅली

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : पाकिस्तान सोबतच्या युद्धात भारताच्या सैनिकांचा ताफा हा डोळ्यात तेल घालून दिवसरात्र भारताचे व नागरिकांचे रक्षण करीत आहेत. त्यांचा आत्मविश्वास द्विगुणित करण्यासाठी व त्यांचे मनोबल बळकट करण्याची हाक देण्याकरिता रविवारी 11 तारखेला उल्हासनगरात शिवसेना शहर शाखेच्या वतीने तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती शिवसेनेचे माजी महानगरप्रमुख राजेंद्र चौधरी यांनी दिली आहे.

उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्यनेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने रविवारी राज्यभरात तिरंगा रॅलीचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या आदेशान्वये रविवारी सकाळी 10 वाजण्याच्या सुमारास उल्हासनगरातील कैलाश कॉलनी चौक, इथून हिललाईन पोलीस स्टेशन समोर, नेताजी चौक, व्हिनस चौक, चार नंबर ओटी, पवई चौक,१७ सेक्शन, शिवाजी चौक, फर्निचर मार्केट, नेहरु चौक शीरु




**सैनिकांचा आत्मविश्वास, मनोबल बळकट करण्याची हाक**

चौक, 1 नंबर पोलीस स्टेशन ते बिर्ला गेट निळकंठेश्वर महादेव मदिर या रस्त्यांवर रॅली निघणार असून त्यात देशप्रेमी नागरिकांनी, शिवसैनिक यांनी मोठ्या प्रमाणावर चार व दुचाकी सोबत सहभागी होण्याचे आवाहन राजेंद्र चौधरी यांनी केले आहे.

# 'मातृदिनानिमित्त निसर्गाला आदरांजली' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे महानगरपालिका, ठाणे जिल्हा पत्रकार संघ, ठाणे शहर दैनिक पत्रकार संघ आणि जिल्हा माहिती कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने यंदाचा "मातृ दिन" एका विशेष आणि अभिनव पद्धतीने साजरा करण्यात येणार आहे. येत्या रविवारी, दि.11 मे 2025 रोजी सकाळी 11.30 वाजता ठाणे जिल्हा माहिती कार्यालयात "मातृदिनानिमित्त निसर्गाला आदरांजली" या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात केवळ जन्मदात्या आईसोबतच जीवनाचा खरा पोषणकर्ता असलेल्या निसर्गाचेही आदराने स्मरण केले जाणार आहे.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश मातृ दिनाच्या पारंपरिक संकल्पनेला व्यापक करून निसर्गाच्या महत्त्वपूर्ण योगदानाला उजाळा देणे, हा आहे. ज्याप्रमाणे एक आई आपल्या मुलांचे पालनपोषण करते, त्याचप्रमाणे निसर्गही आपल्याला जीवन देण्यासाठी आवश्यक असणारे सर्व काही पुरवतो. या दृष्टिकोनातून, या कार्यक्रमाद्वारे पर्यावरण संरक्षणाबद्दल जागरूकता वाढविणे आणि त्या दिशेने कृती करण्याची प्रेरणा देणे अपेक्षित आहे.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप व पर्यावरण व वृक्षतज्ञ विजयकुमार कट्टी हे




मार्गदर्शन करणार आहेत. श्री.विजयकुमार कट्टी यांच्या मार्गदर्शनापर सत्रात सामाजिक आणि पर्यावरणीय कल्याणासाठी कार्यरत असलेल्या वेसाक इंडिया या संस्थेशी चर्चा करण्यात येणार असून या चर्चेद्वारे माध्यमकर्मींना त्यांच्या बातम्यांमध्ये आणि लेखनामध्ये पर्यावरणविषयक विषयांना प्रभावीपणे कसे स्थान देता येईल, जनतेमध्ये या विषयाबाबत कशाप्रकारे जागृती निर्माण करता येईल, याबद्दल मार्गदर्शन करतील. तर जिल्हा माहिती अधिकारी श्री.सानप हे "प्रसारमाध्यम प्रतिनिधींसाठी शासनाच्या सोयीसुविधा" याबद्दलची माहिती देतील.


या कार्यक्रमात माध्यमांची सामाजिक आणि पर्यावरणीय बदलांमध्ये असलेली महत्त्वपूर्ण भूमिका यावर प्रकाश टाकण्यात येणार आहे. पत्रकारिता आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्सच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणासाठी प्रभावी कृती कशा करता येतील, यावर उपस्थित मान्यवर आपले विचार व्यक्त करतील. तसेच, प्रेरणादायी कथा आणि उदाहरणांच्या माध्यमातून सामूहिक पर्यावरणीय जबाबदारीची भावना जागृत करण्याचा प्रयत्न केला जाईल.

याव्यतिरिक्त, माध्यम आणि पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती यांच्यात दीर्घकाळ चालणारे सहकार्य कसे निर्माण करता येईल, यावरही विचारमंथन केले जाईल. स्थानिक स्तरावर सुरू असलेल्या पर्यावरणपूरक उपक्रमांना, हिरवेगार भविष्य घडविण्यासाठी झटणाऱ्या व्यक्तींना आणि नाविन्यपूर्ण सामुदायिक प्रयत्नांना माध्यमांनी कशा प्रकारे प्रोत्साहन द्यावे, यावर मार्गदर्शन केले जाईल. याद्वारे पत्रकार पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतील.

हा अनोखा उपक्रम माध्यमकर्मींना केवळ वैयक्तिक स्तरावर मातृ दिनाच्या शुभेच्छा व्यक्त करण्याची संधी देणार नाही, तर त्यासोबतच एका व्यापक आणि निसर्गप्रेमाच्या दृष्टिकोनातून कथा सांगण्याची प्रेरणा देईल.

ठाणे जिल्हा माहिती कार्यालयात होणाऱ्या या महत्त्वपूर्ण कार्यक्रमात माध्यमकर्मी, पर्यावरणप्रेमी आणि समाजातील जागरूक नागरिक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन ठाणे महानगरपालिका, ठाणे जिल्हा पत्रकार संघ, ठाणे शहर दैनिक पत्रकार संघ आणि जिल्हा माहिती कार्यालय यांनी केले आहे.

## कल्याणमध्ये 'ऑल आऊट कोम्बींग ऑपरेशन'



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे आदेशानुसार परिमंडळ ३ कल्याण अंतर्गत कल्याण व डोंबिवली शहरात शुक्रवारी 9 तारखेला रात्री 10 वा ते रात्री 1 वाजे पर्यंत ऑल आऊट कोंम्बीग ऑपरेशन राबविण्यात आले होते. ऑल आऊट कॉम्बीग ऑपरेशन कारवाई मध्ये परिमंडळ ३ कल्याण मधील ४७ पोलीस अधिकारी व २०८ पोलीस अमंलदार सहभागी झाले होते. ऑल आऊट कोम्बींग ऑपरेशनमध्ये शस्त्र जप्ती (भारतीय हत्यार कायदा ४,२५) ०३, अवैध धंदयावर कारवाई-०९, दारू विकी- ०६, दारूबंदी-०३, तंबाखुजन्य पदार्थ (कोप्ता) कारवाई- २६ केसेस, प्रतिबंधात्मक कारवाई- ८८, म. पोलीस कायदा क.१४२ ०२. अंमली पदार्थ संबंधीत कारवाई ०७, अंमली पदार्थ सेवन-०७ याप्रमाणे एकुण २५ गुन्हे दाखल करण्यात आले. त्याचप्रमाणे फरारी आरोपी, पाहिजे आरोपी, गुंड, हिस्ट्रीशिटर, हददपार इसमांना चेक करण्यात आले. सदर ऑल आऊट कोम्बींग ऑपरेशन कारवाई करीता १० ठिकाणी नाकाबंदी लावण्यात आली होती. नाकाबंदी दरम्यान एकुण २७६ वाहने तपासण्यात येवुन, ६६ वाहनांवर मोटर वाहनर कायद्यान्वये ६६ कारवाई करण्यात येवुन ७८,७०० रुपये दंड वसुल करण्यात आला आहे. यापुढेही कल्याण व डोबिवली शहरात ऑल आऊट कोम्बींग ऑपरेशन कारवाई सुरू राहणार आहे.

## राजपूत परिषदेच्या वतीने महाराणा प्रताप जयंती उत्साहात साजरी

### समाजातील व्यक्तींना राजपूत गौरव पुरस्काराने केले सन्मानित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महाराणा प्रताप जयंतीचे औचित्य साधून राजपूत परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र सिंह चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व ठाणे जिल्हा अध्यक्ष कुँवर राकेश गंभीर सिंह तोमर यांचे नेतृत्वात काशिनाथ घाणेकर नाट्यगृह, ठाणे येथे दि.09 मे 2025 रोजी समाजात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेऊन राजपूत गौरव सन्मान व समाज गौरव सम्मानाने सन्मानित करून महाराणा प्रताप जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार



अर्पण करून करण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रमात गायक सोनू सिंह सुरीला यांनी महाराणा प्रताप यांचे वीर गीतांनी सर्वांना भावनिक केले. कार्यक्रमासाठी आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, संस्थापक राजेंद्र चौहान, उद्योगपती अनिल सिंह, ओमप्रकाश शाही, रामसेना अध्यक्ष रामगुलाम सिंह, माजी नगरसेवक अमित सरैय्या,अमित सिंह, गितांजली देवखेडे, प्रमुख वक्ते ॲड. सुनिल सिंह, समाजसेवक महेंद्र सोडारी, मंगेश सिंह सह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुँवर राकेश सिंह तोमर व सूत्रसंचालन ॲड सुनिल सिंह यांनी केले.

## अँटी करप्शन बोर्ड तर्फे बेस्ट लीडरशिप पुरस्काराने देवेंद्र दत्तात्रय देशमुख यांचा सन्मान




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : अँटी करप्शन बोर्ड (रजि), नवी दिल्ली ही संस्था संपूर्ण देशभर कार्यरत आहे. या संस्थेचे वार्षिक संमेलन कॉन्स्टिट्युशन क्लब ऑफ इंडिया, संसद भवन मार्ग, इंडिया गेट जवळ, नवी दिल्ली या ठिकाणी संपन्न झाले. या कार्यक्रमात देशभरातून जवळपास 150 पदाधिकारी उपस्थित होते. त्यापैकी श्री. देवेंद्र दत्तात्रेय देशमुख, ठाणे जिल्हा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, यांना बेस्ट लीडरशिप पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी अँटी करप्शन बोर्ड, नवी दिल्लीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री आर. के. जैन, राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री आण्णासाहेब खैरनार व अनेक क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार देऊन श्री. देवेंद्र दत्तात्रेय देशमुख यांना सन्मानित करण्यात आले. पुरस्कार स्वीकारल्यानंतर प्रसार माध्यमानी त्यांच्याशी संपर्क साधला असता हा माझा गौरव नसून मी केलेल्या कार्याचा गौरव आहे. याचे संपूर्ण श्रेय त्यांनी ठाणे, पुणे, पालघर आणि महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील माझे सहकारी यांचा सन्मान आहे असे त्यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना सांगितले. समाजातील गरजू व दुर्लक्षित समाजबांधवाना न्याय मिळवून देण्यासाठी व बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यासाठी आम्ही सरकारी योजनांचा अभ्यास करून त्या योजना बेरोजगारांना उपलब्ध करून देणे हे सुद्धा आमचं भविष्यातील कार्य असेल असेही त्यांनी आवर्जून सांगितले. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे समाजातील विविध स्तरावर मनःपूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

## इंस्टाग्रामवरून पाकिस्तानचे समर्थन करणाऱ्याला अटक



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : पहलगाम अतिरेकी हल्ल्याचे प्रत्युत्तर भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानला दिलेला असतानाच, शहरातील एका युवकाने आपल्या मोबाईलच्या ईस्टग्राम स्टोरीवर पाकिस्तानचे समर्थन केल्याबद्दल त्या विरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे, अशी माहिती भिवंडी शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक कृष्णदेव खराडे यांनी दिली आहे. अफसर अली अजगर अली शेख वय १८, असे अटक आरोपीचे नाव आहे. बुधवारी भारतीय सैन्याने पाकिस्तानी अतिरेक्यांवर कारवाई केली. त्याचे संपूर्ण देशवासीयांकडून स्वागत करीत बदला घेतल्याबद्दल आनंदोत्सव साजरा केला जात असताना शहरातील या तरुणाने आपल्या मोबाईलवर इंस्टाग्राम स्टेटसवर *चाहें जो हो जाये सपोर्ट तो बस पाकिस्तान को करेंगे* असा देशविरोधी संदेश ठेवला होता. त्यामुळे त्याच्यावर तात्काळ अटकेची कारवाई पोलिसांच्यावतीने करण्यात आली.

## वसतिगृहासाठी भाड्याच्या इमारती घेऊ इच्छिणाऱ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात इमाव, विजाभज व विमाप्र प्रवर्गातील मॅट्रिकोत्तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी 100 विद्यार्थी क्षमतेचे मुलांसाठी 1 व मुलींसाठी 1 या प्रमाणे 36 जिल्ह्याच्या ठिकाण 72 शासकीय वसतिगृह भाड्याच्या इमारती घेऊन कार्यान्वीत करण्यास शासनाद्वारे मान्यता देण्यात आली आहे. या अनुषंगाने ठाणे जिल्ह्यातील 100 विद्यार्थीनी क्षमतेचे वसतिगृह सुरु करावयाचे आहे. तरी ठाणे शहरामध्ये सदर वसतिगृहासाठी ठाणे रेल्वे स्टेशनजवळ अथवा मध्यवर्ती ठिकाणी या परिसरामधील इमारत मालक / बांधकाम विकासक यांच्याकडून खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार अटी व शर्तींच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहे.

वसतिगृह :- इमाव, विजाभज व विमाप्र प्रवर्गातील मॅट्रिकोत्तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या मुलींचे वसतिगृह.

इमारतीचा तपशिल :- ही जागा ठाणे परिसरात / ठाणे रेल्वे स्टेशन जवळ अथवा ठाणे जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असणे आवश्यक आहे. या इमारतीची जागा शासन निर्णयातील किमान क्षेत्रफळाबाबत अटी व शर्तीची पुर्तता करणारी असावी. ही इमारत अधिकृत असावी व पुर्णत्वाचा दाखला असावा. इमारतीचे भाडे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी ठरविल्यानुसार इमारत मालक देण्यास तयार असल्याबाबत संमतीपत्र देणे आवश्यक राहील, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण, ठाणे सहायक आयुक्त समाधान इंगळे यांनी केले आहे.






# आंबेळे येथील ६५ वर्षीय एकनाथ धनगर बेपत्ता

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील आंबेळे(बु) गावातील रहिवासी एकनाथ हरि धनगर वय ६५ हे घरातून ५ मे २०२५ रोजी अडीच वाजण्याच्या सुमारास राहत्या घरातून सांगून निघन गेले अद्याप पर्यंत ते घरी आले नाही. त्यांचा मोठा मुलगा महेंद्र धनगर यांच्याकडे काशिमीरा येथे मुलांना आंबे घेऊन जातो असे सांगून घरातून निघून गेले याबाबत मुरबाड पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल करण्यात आली आहे. त्यांचा वर्णन पुढील प्रमाणे उंची पाच फूट, चेहरा उभट, नाक बसलेले, केस पांढरे व आकूड, अंगावर पांढऱ्या रंगाचा बाह्याचा फुल शर्ट, काळया रंगाची हाफ पॅन्ट, पायात चप्पल, बोलीभाषा मराठी असा त्यांचा वर्णर आहे. सदरची व्यक्ती कुणास आढळल्यास त्यांनी तात्काळ मुरबाड पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन मुरबाड सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुभाष जुंदरे मोबाईल नंबर ९०११३६८३१६ यांच्याशी संपर्क साधावा.




## ग्रामीण भागात पळसाच्या पानांची

# पत्रावळी झाली हद्दपार

## सर्वत्र प्लास्टिक व थर्माकोलच्या पत्रावळींना पसंती



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : राज्याच्या ग्रामीण भागात विशेषता ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील ग्रामीण व आदिवासी पट्ट्यात तसेच शहर परिसरात विवाह सोहळा, सप्ताह, पूजा व धार्मिक कार्यक्रमात जेवणासाठी मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या पळसाच्या पानांच्या पत्रावळी सध्याच्या आधुनिक युगात हद्दपार झाल्याचे चित्र समोर आले आहे.

येथील आदिवासी बांधवांना पळसाच्या पानांच्या बनवलेल्या पत्रावमुळे या व्यवसायावर एक प्रकारची गदा आल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते दिनेश जाधव यांनी दिली आहे.

ग्रामीण भागात तसेच आदिवासी पट्ट्यात सर्रास पहावयास मिळत आहेत. तर आधुनिकीकरणाच्या युगात प्लास्टिक व थर्माकोलच्या पत्रावळींना लग्न सोहळ्यात तसेच धार्मिक कार्यक्रमातर अधिक पसंती मिळत असल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

विवाह सोहळयात व इतर धार्मिक कार्यक्रमात आता पळसाच्या पानाच्या पत्रावळींची जागा थर्माकोल व प्लास्टिक पत्रावळीने घेतली आहे. त्यामुळे स्थानिकांचे पत्रावळी तयार करणे व पळसाची पाने जंगलातून आणून व्यापाऱ्यांना विकणे असा छोट्या खानी रोजगार देणारा व्यवसाय मागणी कमी होत असल्याने जवळजवळ बंदच झाला आहे.

पुरातन काळापासून मंगलकार्याच्या जेवण समारंभासाठी पळसाच्या पानांपासून बनविलेल्या पत्रावळींचा वापर केला जात असे. आयुर्वेदीय गुणधर्म असलेली पळसाच्या पानाची पत्रावळी सध्या लोप पावत असून, शहरातील पानटपरीवालेही सध्या पार्सल मावा पळसाच्या पानात बांधून न देता आता कागद किंवा प्लास्टिकमध्ये बांधून देत असल्याने पळसाच्या पानांची मागणी आपोआपच घटली आहे.

> यापूर्वी किराणा दुकानात दुकानदार चहाचा गुड बांधून पळसाच्या पानात द्यायचे,परंतु आता छोटी गुळाची भेल पिशवीत बांधलेली असते. लग्न सोहळा तसेच धार्मिक कार्यक्रमात पळसाची पत्रावळ हद्दपार झाली आहे त्या जागी थर्माकोलच्या पत्रावली आल्या आहेत.जंगलातील पळसाच्या पत्रावळी आदिवासी बांधव तयार करून विकायचा त्यावर आता उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे.
> - दिनेश जाधव, सामाजिक कार्यकर्ते,संगम/मुरबाड

परिणामी, जंगल परिसरातील स्थानिकांचा रोजगाराचे साधन असलेला हा व्यवसाय बंद झाल्याचे दिसत आहे.

### पळसाच्या पानावर जेवणाचा स्वाद व रुची वेगळीच

पळसाच्या पानांनी बनविलेल्या पत्रावळीत जेवणाचा स्वाद व रुची अलगच असायचा, असे जुने जाणते वयोवृद्धांच्या प्रतिक्रिया उमटत आहेत.कारण पळसाच्या पत्रावळीला आयुर्वेदिक गुणधर्म असल्याने जेवण लवकर पचत असते.

अशी विविध गुणधर्म असलेली पळसाच्या पानांची पत्रावळी सध्याच्या स्थितीत हद्दपार झालेली असून, तिची जागा थर्माकोल व प्लास्टिक पत्रावळीने घेतली असल्याचे दिसत आहे.

पुरातन काळापासून मंगलप्रसंगी जेवण समारंभासाठी पळसाच्या पानांपासून बनविलेल्या पत्रावळींचा वापर केला जात असे. आयुर्वेदीय गुणधर्म असलेल्या पत्रावळी सध्या लोप पावत असून, पानटपरीवालेही सध्या पार्सल, मावा आदी वस्तू पानात बांधून न देता कागद, प्लास्टिकमध्ये बांधून देत असल्याने पळस पानांची मागणी घटली आणि परिणामी जंगलातील आदिवासींच्या रोजगाराचे साधन बंद झाले आहे.

# युद्धविराम म्हणजे काय?



भारत-पाकिस्तान या दोन्ही देशांमध्ये युद्विरामाची घोषणा करण्यात आली आहे. यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रयत्न केले आहेत, त्यांची स्वतः ट्विट करत दोन्ही देशांनी तात्काळ युद्धविरामासाठी मान्यता दिल्याचं घोषित केलं. या युद्धविरामाला किंवा युद्धबंदीला इंग्रजी भाषेत Ceasefire असं म्हणतात. हा खरंतर एक प्रकारचा करार असतो, जो तिसऱ्या देशाच्या मध्यस्थीद्वारे किंवा साक्षीनं केला जातो. ज्या द्वारे अधिकृतरित्या दोन्ही बाजूंकडून कुठल्याही प्रकारचा गोळीबार किंवा हल्ल्यांचा प्रकार केला जाणार नाही, असं लिखित स्वरुपात मान्य केलं जातं.

### युद्धविरामाचं उद्दिष्ट काय ?

युद्धविरामाचे तात्काळ उद्दिष्ट हिंसाचार थांबवणे हे आहे. परंतू युद्धविरामांचे मूळ उद्दिष्ट वेगवेगळे असतात. युद्धविरामांचा उद्देश अल्पकालीन मर्यादित गरजा पूर्ण करण्यासाठी जसं की मानवतावादी दृष्टीकोनातून मदत प्रदान करणे, संघर्ष कमी करण्यासाठी किंवा वाद शांततेने सोडवण्याचा प्रयत्न असतो. एखाद्या देशाचा हेतू संघर्षाचे शांततापूर्ण निराकरण करण्यासाठी युद्धविराम असा असू शकत नाही, तर तो पूर्णपणे शांतता असाच असायला हवा.

### आंतरराष्ट्रीय कायदा काय ?

मध्यस्थीद्वारे किंवा अन्यथा शांतता प्रक्रियेचा भाग म्हणून युद्धविरामाचा करार केला जाऊ शकतो. तसंच संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या (UNSC) ठरावांद्वारे संयुक्त राष्ट्रांच्या सनदीचा अध्याय VII द्वारे हा करार लागू होतो. युद्धविराम हा तात्पुरता किंवा अनिश्चित काळासाठी असू शकतो. यामध्ये armistice आणि Ceasefire यामध्ये फरक आहे. कारण armistice हा युद्धाचा औपचारिक शेवट आहे तर Ceasefire हा तात्पुरता थांबा असू शकतो.

### युद्धविरामाचा फायदा काय ?

युद्धाचे परिणाम हे भीषण असतात यामुळं ज्या बाजूचं सर्वाधिक नुकसान होईल, तो देश पुन्हा पुर्ववत होण्यासाठी अनेक वर्षांचा काळ जातो. कमी नुकसान होणाऱ्या देशांनाही हाच नियम लागू आहे. त्यामुळं युद्धविराम करारामुळं सहाजिकच दोन्ही क्षेत्रांमध्ये शांतता प्रस्थापित होते, यामुळं संभाव्य भीषण जीवितहानी आणि वित्तहानी टाळता येते. युद्धविराम करारांच्या टिकाऊपणावर अनेक घटकांचा परिणाम होतो. जसं की निशस्त्रीकरण क्षेत्रं, सैन्य मागे घेणे आणि या दोन्ही देशांमध्ये शांततेसाठी तिसऱ्या देशाची हमी देणं. हा तिसरा पक्ष किंवा देश इतर दोन संघर्ष सुरु असलेल्या देशांमध्ये हल्लाला प्रोत्साहन मिळणार नाही यासाठी प्रयत्न करतात. यासाठी विशिष्ट यंत्रणाही तयार केली जाते, तेव्हाच हा युद्धविराम करार दीर्घकाळ टिकाऊ ठरतो.




# 'तुमचा सातबारा नाही... कारवाई तर होणारच'

## सहायक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी कारवाईत फेरीवाल्यांना सुनावलं



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : पूर्वेकडील 'फ' प्रभाग क्षेत्र हद्दीतील स्टेशनबाहेरील फेरीवाल्यांवर नेहमीप्रमाणे कारवाई सुरु होती. फेरीवाल्यांवर सातत्याने कारवाई सुरु असते. शुक्रवारी 9 तारखेला सायंकाळी सहायक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी पथकासह कारवाई करताना 'स्टेशनबाहेरील रस्तावर तुमचा सातबारा नाही, कारवाई तर होणारच' अशा शब्दात सुनावले. कैलास लस्सी ते स्टेशनबाहेरील परिसरात कारवाई सुरु असतानाही दुकानबाहेर फेरीवाले बसलेले पाहून दुकानदारांनी फेरीवाल्यांना बसू देऊ नये असे आवाहन केले.

स्टेशनबाहेरील परिसर फेरीवाला मुक्त करण्याकरता पालिका प्रशासनाकडून सातत्याने कारवाई सुरु आहे. डोंबिवली पूर्वेकडील स्टेशन बाहेरील परिसरातील फेरीवाल्यांवर 'फ' प्रभाग क्षेत्र सहायक आयुक्त हेमा मुंबर कर यांनी फेरीवाला अतिक्रमण विभागाचे पथकप्रमुख व कर्मचारी यांनी फेरीवाल्यांवर कारवाई केली.'स्टेशनबाहेरील रस्तावर तुमचा सातबारा नाही... कारवाई तर होणारच' असे फेरीवाल्यांना सुनावले. अगदी अर्धा रस्तावर अतिक्रमण केल्यासारखे फेरीवाल्यांनी जागेवर भाजी,फळे, खेळणी, वस्तू ठेवल्या होत्या. काही दुकानासमोर फेरीवाले बसत आल्याने नागरिकांना त्रास होत होता. दुकानदारांनी फेरीवाल्यांना दुकानासमोर बसू देऊ नये असे मुंबरकर यांनी सांगितले.

सहायक आयुक्त मुंबरकर यांची फेरीवाल्यांवर कारवाई सुरु असताना वाहतुकीस अडचण निर्माण होई अशा प्रकारे रस्त्यावर दुचाकी पार्क पाहून त्या दुचाकींचे फोटो कर्मचाऱ्यांनी काढले. वाहतूक पोलिसांना या दुचाकीचे फोटो पाठवून कारवाई असे मुंबरकर यांनी यावेळी सांगितले.

## बी. के. बिर्ला नाईट कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा

# राष्ट्रीय स्तरावरील स्टार्टअप स्पर्धेत सहभाग



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : बी. के. बिर्ला नाईट कॉलेजच्या Incredible Thinker या विद्यार्थ्यांच्या चमूने "SBI College Youth Ideation 2025" या राष्ट्रीय स्तरावरील स्टार्टअप स्पर्धेत सहभाग घेतला. या चमूमध्ये वंश शाह, विक्रम चौधरी आणि सचिन वर्मा यांचा समावेश होता, आणि त्यांना उद्योजकता सेलचे प्रमुख डॉ. रूपेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

स्पर्धेसाठी तांत्रिक समर्थन देण्यात धरणी मुदलियार आणि लक्ष्मी सिंग यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते, ज्यांनी विद्यार्थ्यांना सशक्त तांत्रिक तयारीसाठी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी तयार केलेली "आयुररक्षा" ही आरोग्यसेवा संबंधित अभिनव कल्पना सादर करण्यात आली, ज्याचा उद्देश होता रुग्णांना तात्काळ अँब्युलन्स सेवा आणि वैद्यकीय मदत डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे सहज उपलब्ध करून देणे.

ही स्पर्धा तीन टप्प्यांत पार पडली. पहिल्या टप्प्यात निवडीनंतर विद्यार्थ्यांना त्यांची स्टार्टअप कल्पना एका रीलद्वारे सोशल मीडियावर सादर करण्याचे आव्हान दिले गेले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या रीलला ३१ हजार हून अधिक लाईक्स, शेअर्स व कमेंट्स मिळाल्या, ज्यामुळे त्यांची दुसऱ्या टप्प्यासाठी निवड झाली.

दुसऱ्या टप्प्यात उत्पादन विक्री किंवा डिजिटल पिचिंगची जबाबदारी देण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण करत टॉप १०० संघांमध्ये स्थान पटकावले. त्यानंतर त्यांना थेट आयआयटी दिल्लीमध्ये गुंतवणूकदारांसमोर सादरीकरण करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.

दिल्लीतील अंतिम टप्प्यात विद्यार्थ्यांनी आयुररक्षा ही संकल्पना विविध गुंतवणूकदारांसमोर सादरीकरण केली. रुग्णवाहिकेसाठी Uber/Ola पद्धतीने सेवा देणारी ही प्रणाली, डॉक्टर उपस्थित असलेली वैद्यकीय मदत, विमा क्लेम, डिजिटल नोंदणी व तत्काळ उपचार यांसारख्या वैशिष्ट्यांनी भरलेली होती. दिल्ली सरकारच्या प्रतिनिधींनी या कल्पनेत रस दाखवला.

या उपक्रमात बी. के. बिर्ला नाईट कॉलेजचा Incredible Thinker संघ देशभरातून आलेल्या ४५,००० हून अधिक कल्पनांमधून अंतिम टॉप १०० मध्ये पोहोचला. या संधीद्वारे वंश शाह, विक्रम चौधरी व सचिन वर्मा यांना स्टार्टअप संस्कृती, गुंतवणुकीचे महत्त्व आणि व्यावसायिक नेटवर्किंग याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. हा प्रवास केवळ स्पर्धा नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या उद्योजकीय क्षमतेच्या विकासाची सुरुवात ठरली.

# मोठ्या आवाजाचे फटाके फोडू नका



पहलगाम हल्ल्याचा प्रतिशोध घेताना भारताने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानातील ९ प्रमुख आतंकवादी तळ उध्वस्त केले ज्यामुळे पाकिस्तान पुरता बिथरला आणि भारतावर हल्ले करण्याची तयारी करू लागला आहे. ८ मेला पाकिस्तानने भारताच्या दिशेने डागलेले आठ मिसाईल्स भारताने हवेतच नष्ट केली. भारताच्या हद्दीत घुसवलेले पन्नासहून अधिक ड्रोनसुद्धा भारतीय सैन्याने पाडले. एकूणच देशाच्या उत्तर भागात सध्या युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. केवळ उत्तर भारतच नव्हे, तर भारतातील अन्य प्रमुख शहरेसुद्धा पाकिस्तानच्या रडारवर आहेत त्यामुळे सर्व ठिकाणच्या नागरिकांना आजमितीला सतर्क राहण्याची आवश्यकता आहे. त्यातच महाराष्ट्रात सध्या लगीनसराई सुरु असल्याने प्रतिदिन कुठे ना कुठे वरातीचे आवाज कानी पडत आहेत. धुमधडाक्यात केल्या जाणाऱ्या लग्नात फटाकेसुद्धा मोठ्या प्रमाणात फोडले जात आहेत. ज्यामध्ये सुतळी बॉम्बसुद्धा आलेच. या सुतळी बॉम्बचा बराच मोठा आवाज होतो. याशिवाय सध्या आयपीएलचे सामनेसुद्धा सुरु असल्याने आपल्या आवडीचा संघ जिकल्याचा आनंद साजरा करण्यासाठी चाहत्यांकडून फटाके फोडले जात आहेत. सध्याची स्थिती पाहता अशा बॉम्बचा आवाज झाल्यावर ते कोणाच्या लग्नाच्या वरातीत वाजत आहेत कि आपल्या भागात शत्रूचे बॉम्बहल्ले होत आहेत याची काहीच कल्पना नागरिकांना येत नाही. या आवाजाने लोकांमध्ये भय निर्माण होत आहे. त्यामुळे देशावरील युद्धाचे सावट दूर होईपर्यंत लग्नात वा अन्य आनंदोत्सवात मोठ्या आवाजाचे फटाके फोडण्यावर बंदी घालण्यात यावी.

- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई ९६६४५५९७८०

# पंतप्रधान मोदींनी करुन दाखवल भारतीय वायुसेनेला सलाम

## - शिवसेना तालुका प्रमुख महेश पाटील



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : भारतीय वायूसेनेने एअर स्ट्राईक करून पाकिस्तानमधील दहशदवादी तळावर हवाई हल्ला करून अतिरेक्यांना ढगात पाठवले. आपल्या बहिणीचं कुंकु पुसणाऱ्या अतिरेकीना मारल्याबद्दल संपूर्ण देश आनंद व्यक्त करत आहे. शिवसेना कल्याण तालुका प्रमुख महेश पाटील यांच्या सांगर्ली येथील जनसंपर्क कार्यालयासमोर नागरिक व कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.यावेळी पाटील म्हणाले, पंतप्रधान मोदींनी करून दाखवल, भारतीय वायुसेनेला सलाम आहे.

याविषयी शिवसेना कल्याण तालुकाप्रमुख तथा माजी नगरसेवक महेश पाटील म्हणाले, जे टीका करत होते, आपल्या देशात राहून आपलं मीठ खाऊन आपल्या देशाच्या विरोधक बोलतात त्यांचं तोंड बंद करण्याचा काम भारतीय वायुसेनेने केले आहे. पंतप्रधान मोदी यांनी आदेश दिलेले की जेवढे पाकिस्तानी नागरिक असेल त्यांना आपल्या देशातून बाहेर काढावे. परंतु आपल्या देशात अनेक जवळजवळ पाच करोड पेक्षा जास्त बांगलादेशातील मुसलमान असावेत. जर युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली तर आपल्या सैन्यातील एका तुकडीला बांगलादेशातील मुसलमानाशी लढावे लागेल अशी परिस्थिती आहे.म्हणून प्रत्येक नागरिकांनी सतर्क राहायला पाहिजे. आपल्या बाजूला कोण बांगलादेशी राहतो त्याची माहिती पोलिसांना दिली पाहिजे. अनेक बांगलादेशीय मुसलमान कलकत्त्याचा आधार कार्ड घेऊन राहतात, त्याचे सुद्धा शहानिशा केली पाहिजे आणि त्यांच्यावरती कारवाई केली पाहिजे. परंतु पोलिसांकडे एक अडचणीचा विषय असा की प्रत्येक वेळेला वेरिफिकेशन करायला ते कलकत्त्याला जाऊ शकत नाहीत तर एखाद्याची सिस्टम बसवली पाहिजे की इथून ते व्हेरिफाय झाला पाहिजे की खरोखर तो कलकत्त्याचा रहिवासी आहे की बांगलादेशाचा आहे हे समजेल.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११९२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024